राज्य सेवा (मुख्य) परीक्षा - २०२१ दिनांक ०८ मे, २०२२.

प्रश्नपुस्तिका क्रमांक
**BOOKLET No.**

**207153**

2021

**D15** संच क्र. **A**

# प्रश्नपुस्तिका

## सामान्य अध्ययन – I

**वेळ : 2 (दोन) तास**

**एकूण प्रश्न : 150**
**एकूण गुण : 150**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **150** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तराकरीता 25% किंवा 1/4 एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/कमी करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

1. खालीलपैकी कोणते जैविक घटक विभागातील कृषि पद्धती ठरविण्यास कारणीभूत आहेत ?

(a) पिक पद्धती (आराखडा)
(b) पिकांची फेरपालट
(c) तापमान
(d) प्रकाश-संस्लेशक कार्यक्षमता

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (b)
(2) फक्त (c) आणि (d)
(3) फक्त (a), (b) आणि (c)
(4) फक्त (a), (b) आणि (d)

Which of the following are biological factors that determine the type of agriculture in the region ?

(a) Cropping pattern
(b) Crop rotation
(c) Temperature
(d) Photosynthetic efficiency

**Answer Options :**

(1) Only (a) and (b)
(2) Only (c) and (d)
(3) Only (a), (b) and (c)
(4) Only (a), (b) and (d)

---

2. खालीलपैकी कोणते/कोणती विधान/विधाने **बरोबर** आहे/आहेत ?

(a) कृत्रीम परिसंस्थेचे उदाहरण म्हणजे मका, गहू, भात-शेती, इत्यादि पीक जमिनी.
(b) बाग ही नैसर्गिक परिसंस्था आहे.
(c) भूभागावरील (वन, गवताळ प्रदेश, वाळवंट) आणि जलचर (कमळ वा मांसल) हे नैसर्गिक परिसंस्था आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a)
(2) फक्त (b)
(3) फक्त (a) आणि (b)
(4) फक्त (a) आणि (c)

Which of the following statement/s is/are **true** ?

(a) Example of artificial ecosystem is croplands like maize, wheat, rice-fields, etc.
(b) Garden is a natural ecosystem.
(c) Terrestrial (forest, grasslands, deserts) and aquatic (lotic or lentic) are the natural ecosystems.

**Answer Options :**

(1) Only (a)
(2) Only (b)
(3) Only (a) and (b)
(4) Only (a) and (c)

3. ____________ याची अशी व्याख्या करता येईल की दिलेल्या मूळस्थानामध्ये वनस्पतीच्या जाती/प्रजाती प्राणी आणि सूक्ष्मजीव यांचे आस्तित्व.

(1) जैवविविधता (2) परिसंस्था

(3) अनुवंशीक विविधता (4) यापैकी नाही

__________ may be defined as the sum total of species richness i.e., number of species of plants, animals and micro-organisms occurring in a given habitat.

(1) Biodiversity (2) Ecosystem

(3) Genetic diversity (4) None of these

4. खरिप हंगामात ऑगष्ट च्या पहिल्या पंधरवडयात पाऊस सुरू झाल्यास खालीलपैकी कोणती पिके घ्यावित ?

(a) सुर्यफुल (b) कापुस

(c) संकरीत बाजरी (d) भात

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (c) (2) फक्त (b) आणि (d)

(3) फक्त (a) आणि (d) (4) फक्त (b) आणि (c)

Which of the following crops should be grown if the rains start in the first fortnight of August during the Kharif season ?

(a) Sunflower (b) Cotton

(c) Hybrid pearl millet (d) Rice

**Answer Options :**

(1) Only (a) and (c) (2) Only (b) and (d)

(3) Only (a) and (d) (4) Only (b) and (c)

5. ____________ हे साधारणपणे लांब (दिर्घ) कालावधीच्या हवामानाची सरासरी होय.

(1) हवामानशास्त्र (2) हवामान

(3) जलशास्त्र (4) कृषि हवामानशास्त्र

____________ is commonly considered to be the weather averaged over a long period of time.

(1) Meteorology (2) Climate

(3) Hydrology (4) Agrometeorology

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

6. जोड्या लावा :

| | संस्था | | ठिकाण |
|---|---|---|---|
| (a) | एन.बी.पी.जी.आर. | (i) | जोधपूर |
| (b) | एन.बी.ए.जी.आर. | (ii) | नागपूर |
| (c) | सी.ए.झेड.आर.आय. | (iii) | कर्नाल |
| (d) | सी.आय.सी.आर. | (iv) | नवी दिल्ली |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (2) | (iii) | (ii) | (iv) | (i) |
| (3) | (i) | (iv) | (iii) | (ii) |
| (4) | (iii) | (i) | (ii) | (iv) |

Match the following :

| | Institution | | Location |
|---|---|---|---|
| (a) | NBPGR | (i) | Jodhpur |
| (b) | NBAGR | (ii) | Nagpur |
| (c) | CAZRI | (iii) | Karnal |
| (d) | CICR | (iv) | New Delhi |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (2) | (iii) | (ii) | (iv) | (i) |
| (3) | (i) | (iv) | (iii) | (ii) |
| (4) | (iii) | (i) | (ii) | (iv) |

7. कारणांचा विचार न करता जास्त कालावधीसाठी विचारात घेतला जाणारा __________ गुणधर्मांचा विचार करून हवामानात होणारा बदल म्हणजे हवामान बदल.

(1) भौगोलिक (2) सांख्यिकीय
(3) जैविक (4) भौतिक

Climate change is a change in the _________ properties of the climate system when considered over long periods of time, regardless of cause.

(1) Geographical (2) Statistical
(3) Biological (4) Physical

8. जमिनीवर वनस्पती वाढीसाठी पाणी आणि कार्बन डायऑक्साईड यांची उपलब्धता हे महत्त्वाचे घटक आहेत तर पाण्यामध्ये, प्रकाश आणि मिसळलेला __________ महत्त्वाचे घटक आहेत.

(1) हायड्रोजन (2) ऑक्सीजन

(3) हेलीअम (4) मिथेन

On land, availability of water and $CO_2$ are important factors for plant growth, while in water, light and dissolved __________ are important factors.

(1) Hydrogen (2) Oxygen

(3) Helium (4) Methane

---

9. ठराविक कालावधीमध्ये खालीलपैकी कोणत्या उत्पादकतेत वनस्पती श्वसनामध्ये वापरात येणाऱ्या सेंद्रिय पदार्थापेक्षा त्यांची वनस्पती उतीमध्ये जास्त प्रमाणात साठवण होते ?

(1) एकूण प्राथमिक उत्पादकता (2) निव्वळ प्राथमिक उत्पादकता

(3) निव्वळ समुदायाची उत्पादकता (4) दुय्यम उत्पादकता

Which of the following productivity refers to the storage of organic matter in plant tissues exceeding the respiratory use by plants during the period of measurement ?

(1) Gross primary productivity (2) Net primary productivity

(3) Net community productivity (4) Secondary productivity

---

10. खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

(a) लोकसंख्येच्या वाढीसह, सिंचन क्षेत्र वाढत आहे आणि कृषि विज्ञानातील प्रगतीमुळे, बहूतेक विस्तृत पीक पद्धती सधन पीक घेण्यास मार्ग देत आहेत.

(b) लोकसंख्येच्या वाढीसह, सिंचन क्षेत्र वाढत आहे आणि कृषि विज्ञानातील प्रगतीमुळे, बहूतेक सधन पीक पद्धती विस्तृत पीके घेण्यास मार्ग देत आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) (2) फक्त (b)

(3) (a) आणि (b) (4) कोणतेही बरोबर नाही

Which of the following statements is correct ?

(a) With the increase in population, the irrigated area is increasing and with advances in agricultural sciences, most of the extensive cropping patterns are giving way to intensive cropping.

(b) With the increase in population, the irrigated area is increasing and with advances in agricultural sciences, most of the intensive cropping patterns are giving way to extensive cropping.

**Answer Options :**

(1) Only (a) (2) Only (b)

(3) (a) and (b) (4) None of the above

11. खास व्यवस्थापन पद्धतीने जमिनीची पिक उत्पादन करण्याची क्षमता व जी पिक उत्पन्नात मोजली जाते त्यास __________ म्हणतात.

(1) जमिनीची सुपिकता

(2) जमिनीची उत्पादकता

(3) जमिनीची घनता

(4) यापैकी नाही

__________ is the capacity of the soil to produce crops with specific systems of management and is expressed in terms of yield.

(1) Soil fertility

(2) Soil productivity

(3) Soil density

(4) None of these

---

12. पृथ्वीतळावरती आस्तित्वात असणाऱ्या बाबी आणि ज्या घटना घडत आहेत त्याचे संगणकीकृत साधनाद्वारे रेखांकन आणि विश्लेषण केले जाते त्यास __________ असे संबोधतात.

(1) भौगोलिक निर्देशांक (समन्वयक)

(2) भौगोलिक माहिती व्यवस्था

(3) भौगोलिक संदर्भ

(4) भौगोलिक विस्तृत सामग्री

__________ is a computer based tool for mapping and analysing things that exist and events that happen on the Earth.

(1) Geographic coordinates

(2) Geographic information system

(3) Geographic reference

(4) Geographic database

**13.** जोड्या लावा :

| | मृदा क्षितीज पदनाम | | संक्षिप्त वर्णन |
|---|---|---|---|
| (a) | Oe | (i) | मशागत किंवा इतर उलथापालत |
| (b) | Bz | (ii) | जिप्समचा संचय |
| (c) | Cy | (iii) | जिप्समपेक्षा जास्त विद्राव्य क्षारांचा संचय |
| (d) | Ap | (iv) | विघटीत सेंद्रीय पदार्थ |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (iii) | (iv) | (ii) |
| (2) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (3) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (4) | (iii) | (ii) | (i) | (iv) |

Match the following :

| | Soil horizone designation | | Brief description |
|---|---|---|---|
| (a) | Oe | (i) | Tillage or other disturbances |
| (b) | Bz | (ii) | Accumulation of gypsum |
| (c) | Cy | (iii) | Accumulation of salts more soluble than gypsum |
| (d) | Ap | (iv) | Decomposed organic matter |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (iii) | (iv) | (ii) |
| (2) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (3) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (4) | (iii) | (ii) | (i) | (iv) |

14. जोड्या लावा :

| | **पीक अन्नद्रव्ये** | | **उदाहरण** |
|---|---|---|---|
| (a) | मुलभूत अन्नद्रव्य | (i) | तांबे |
| (b) | प्राथमिक अन्नद्रव्य | (ii) | स्फूरद |
| (c) | दुय्यम अन्नद्रव्य | (iii) | प्राणवायु |
| (d) | सुक्ष्म अन्नद्रव्य | (iv) | गंधक |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (2) | (iii) | (ii) | (iv) | (i) |
| (3) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (4) | (i) | (ii) | (iii) | (iv) |

Match the following :

| | **Plant nutrients** | | **Example** |
|---|---|---|---|
| (a) | Basic nutrient | (i) | Copper |
| (b) | Primary nutrient | (ii) | Phosphorus |
| (c) | Secondary nutrient | (iii) | Oxygen |
| (d) | Micro nutrient | (iv) | Sulphur |

**Answer options :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (2) | (iii) | (ii) | (iv) | (i) |
| (3) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (4) | (i) | (ii) | (iii) | (iv) |

---

15. आंतरराष्ट्रीय मृद शास्त्र सोसायटी प्रमाणीत वर्गीकरणानुसार चिकणमाती कणांचा व्यास __________ आहे.

(1) 0·002 मि.मि. पेक्षा कमी
(2) 0·002 ते 0·05 मि.मि.
(3) 0·001 ते 0·01 मि.मि.
(4) 0·007 ते 0·09 मि.मि.

The diameter of clay particles as per the International Soil Science Society Standards classification is __________ .

(1) Less than 0·002 mm
(2) 0·002 – 0·05 mm
(3) 0·001 – 0·01 mm
(4) 0·007 – 0·09 mm

16. सर्वसाधारणपणे ___________ जास्त असल्यास जमीन घट्ट असते, मातीतील कण रचना अयोग्य असते, मातीच्या कणांतील पोकळी कमी असते पर्यायाने वनस्पतीच्या वाढीवर अनिष्ठ परिणाम होतो.

(1) जमिनीची स्थूल घनता (2) जमिनीची आम्लता
(3) खनिजे (4) जामिनीची विम्लता (अल्कता)

In general, higher the ___________ the more compact is the soil, the more poorly defined is the soil structure and there are smaller amount of pore spaces that restrict the plant growth.

(1) bulk density of the soil (2) soil acidity
(3) minerals (4) soil alkalinity

---

17. __________ या पीक पद्धतीमध्ये लांब आणि अरूंद पट्टयात धूपेस प्रतिबंध करणारी पिके (पसरट घन वाढणारी) आणि धूपेस प्रतिबंध न करणारी पिके (उभट वाढणारी) एका आड एक पट्टयात घेतली जातात.

(1) मिश्र (2) दुबार (3) पट्टा (4) आंतरपिक

__________ cropping is a system of crop production in which long and narrow strips of erosion resisting crops (close growing crops) are alternated with strips of erosion permitting crops (erect growing crops).

(1) Mixed (2) Sequence (3) Strip (4) Inter

---

18. जमिनीच्या धनविद्युत भारीत कणांच्या अदलाबदलीचे प्रमाण जमिनीत (मातीत) __________ याचे प्रमाण वाढल्यास वाढते.

(a) वाळू
(b) पोयटा
(c) चिकण कण

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) (2) फक्त (b)
(3) फक्त (c) (4) यापैकी नाही

The Cation Exchange Capacity (CEC) increases with increase in __________ content of the soil.

(a) sand
(b) silt
(c) clay

**Answer Options :**

(1) Only (a) (2) Only (b)
(3) Only (c) (4) None of these

---

**19.** जमिनीत __________ चे प्रमाण जास्त असल्यास जमिनीस काळा ते गर्द तपकीरी रंग येतो.

(1) लोह (2) सेंद्रिय पदार्थ

(3) सिलीका, चुना व इतर क्षार (4) लोह आक्साईडची मिश्रणे

Soils containing high amount of __________ show the colour variation from black to dark brown.

(1) iron (2) organic matter

(3) silica, lime and other salts (4) mixture of iron oxides

---

**20.** जोड्या लावा :

| | संज्ञा | | संबंध |
|---|---|---|---|
| (a) | पेट्रोलॉजी | (i) | मृदेची उत्पत्ती, सर्वेक्षण व वर्गीकरण |
| (b) | इडॅफोलॉजी | (ii) | पृथ्वीच्या पृष्ठभागावरील नैसर्गिक आवरण (थर) ज्यात वनस्पतीची वाढ होते |
| (c) | पेडॉलॉजी | (iii) | खडकाचे विज्ञान |
| (d) | मृदा | (iv) | उच्च वनस्पतीच्या दृष्टीकोणातुन मृदा |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (iii) | (iv) | (ii) |
| (2) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (3) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (4) | (iv) | (iii) | (ii) | (i) |

Match the following :

| | Term | | Relation |
|---|---|---|---|
| (a) | Petrology | (i) | Genesis, survey and classification of soil |
| (b) | Edaphology | (ii) | Natural body on the Earth's surface in which the plant grows |
| (c) | Pedology | (iii) | Science of rocks |
| (d) | Soil | (iv) | Soils from standpoint of higher plants |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (iii) | (iv) | (ii) |
| (2) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (3) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (4) | (iv) | (iii) | (ii) | (i) |

**21.** पुढीलपैकी कोणती पावसाचे पाणी साठवण (जलपुनर्भरण) करण्याची उद्दीष्टे आहेत ?

(a) रस्त्यावरील पाण्याचा पुर टाळण्यासाठी

(b) भूगर्भाची पाणी पातळी वाढविण्यासाठी

(c) भूगर्भातील पाण्याचे प्रदुषण कमी करण्यासाठी

(d) पावसाच्या पाण्याचा अपक्षय व ऱ्हास कमी करण्यासाठी

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a), (b) आणि (c)

(2) फक्त (b), (c) आणि (d)

(3) फक्त (a), (c) आणि (d)

(4) वरीलपैकी सर्व

Which of the following are the objectives of rainwater harvesting ?

(a) To avoid flooding of roads

(b) To raise the groundwater table

(c) To reduce groundwater contamination

(d) To reduce run-off loss

**Answer Options :**

(1) Only (a), (b) and (c)

(2) Only (b), (c) and (d)

(3) Only (a), (c) and (d)

(4) All of the above

---

**22.** __________ हे व्यवस्थापन तंत्र आहे ज्यामध्ये पाण्याचा अपव्यय कमीत कमी केला जातो किंवा पाण्याचा अत्यंत कार्यक्षम पद्धतीने वापर केला जातो.

(1) मृदसंधारण

(2) जलसंधारण

(3) बाष्पोच्छवास

(4) झाडेझुडपे

__________ is the management technique which eliminates the wastage of water or maximises the efficiency of its use.

(1) Soil conservation

(2) Water convention

(3) Evapotranspiration

(4) Vegetation

---

23. कोरडवाहू क्षेत्रात जमिनीतील __________ हा महत्त्वाचा प्रश्न असल्याने भरपूर प्रमाणात रासायनीक खतांचा वापर करता येत नाही.

(a) रचना

(b) तापमान

(c) ओल (पाणी)

(d) पोत

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a)

(2) फक्त (c)

(3) फक्त (a) आणि (b)

(4) फक्त (a) आणि (d)

Chemical fertilizers on large scale cannot be used in dryland areas due to the problem of soil __________.

(a) Structure

(b) Temperature

(c) Moisture

(d) Texture

**Answer Options :**

(1) Only (a)

(2) Only (c)

(3) Only (a) and (b)

(4) Only (a) and (d)

24. अधिकतम उत्पादन आणि पाणी वापर क्षमता हे केवळ __________ द्वारे शक्य आहे.

(1) योग्य प्रमाणात ओलावा

(2) प्रमाणशीर ताटांची संख्या

(3) योग्य प्रमाणात खतांचा वापर

(4) वरीलपैकी सर्व

The maximum yield and water use efficiency is possible only through optimum __________.

(1) Level of soil moisture

(2) Plant population

(3) Fertilization

(4) All of the above

**25.** जेव्हा सिंचनासाठीचे पाणी महाग असते तेव्हा सिंचन पुढील प्रमाणे केले पाहीजे :

(a) सिंचनाची वारंवारता वाढवा

(b) सिंचनाची वारंवारता कमीं करा

(c) वापरलेल्या प्रती युनिट पाण्यापासून जास्तीत जास्त पीक उत्पादन

(d) प्रती युनिट क्षेत्रापासून जास्तीत जास्त पीक उत्पादन

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) (2) फक्त (b)

(3) फक्त (c) (4) फक्त (d)

When irrigation water is expensive, irrigation should be scheduled to :

(a) Increase the irrigation frequency

(b) Decrease the irrigation frequency

(c) Maximise crop production per unit of applied water

(d) Maximum crop production per unit area

**Answer Options :**

(1) Only (a) (2) Only (b)

(3) Only (c) (4) Only (d)

---

**26.** कृषि अवर्षण (दुष्काळ) ची महत्त्वाची कारणे म्हणजे :

(a) अपुरे पाऊसमान

(b) पावसाचे अनियमीत वितरण

(c) पावसाचे दिर्घ खंड

(d) मान्सुनचे उशीरा आगमन

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) बरोबर आहेत (2) (a), (b) आणि (c) बरोबर आहेत

(3) (c) आणि (d) बरोबर आहेत (4) सर्व विधाने बरोबर आहेत

The important causes for agricultural drought are :

(a) Inadequate precipitation

(b) Erratic distribution of rainfall

(c) Long dry spell

(d) Late onset of Monsoon

**Answer Options :**

(1) (a) and (b) are correct (2) (a), (b) and (c) are correct

(3) (c) and (d) are correct (4) All are correct

27. पाणलोट व्यवस्थापनाची उद्दीष्टे कोणती आहेत ?

(a) प्रक्षेत्र चारी विकसीत/निर्माण करणे

(b) जमिनीचा कार्यक्षम वापर

(c) पुर नियंत्रण

(d) घरगुती, कृषि व औद्योगीक गरजासाठी पुरेसा पाणी पुरवठा

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (d)

(2) फक्त (b) आणि (c)

(3) फक्त (b), (c) आणि (d)

(4) फक्त (a), (b) आणि (c)

What are the objectives of watershed management ?

(a) Development of field channels

(b) Efficient use of land

(c) Flood control

(d) Adequate water supply for domestic, agriculture and industrial needs

**Answer Options :**

(1) Only (a) and (d)

(2) Only (b) and (c)

(3) Only (b), (c) and (d)

(4) Only (a), (b) and (c)

28. खालीलपैकी कोणते पीक खार जमिनीसाठी तुलनात्मकदृष्ट्या जादा सहनशील आहे ?

(1) भात

(2) बार्ली

(3) हरभरा

(4) मुळा

Which crop, among the following, is relatively more tolerant to saline soils ?

(1) Rice

(2) Barley

(3) Chickpea

(4) Radish

29. ज्या पाण्याची विद्युत वाहकता ही ________ मिली सायमेन्स प्रति मिटर असते, असे पाणी बहूतेक सर्व पिकांसाठी बहूतेक सर्व जमिनीत सिंचनासाठी योग्य असते.

(a) 25 पर्यन्त
(b) 25 पेक्षा जास्त
(c) 75 पर्यन्त
(d) 75 पेक्षा जास्त

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) (2) फक्त (b) आणि (c)
(3) फक्त (c) (4) फक्त (d)

Water with EC value ________ milli Siemens per metre is suitable for irrigation of most of the crops on most of the soils.

(a) up to 25
(b) above 25
(c) up to 75
(d) above 75

**Answer Options :**

(1) Only (a) (2) Only (b) and (c)
(3) Only (c) (4) Only (d)

30. बाष्पोत्सर्जनातून होणारा पाण्याचा व्यय कमी करता येतो :

(a) प्रतिबाष्पोत्सजके वापरून
(b) परावर्तके वापरून
(c) वाढ रोधके वापरून

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (b) (2) फक्त (b) आणि (c)
(3) फक्त (a) आणि (c) (4) वरीलपैकी सर्व

Water loss through transpiration can be reduced by :

(a) Using antitranspirants
(b) Using reflectants
(c) Using growth retardants

**Answer Options :**

(1) Only (a) and (b) (2) Only (b) and (c)
(3) Only (a) and (c) (4) All of the above

**31.** इ.स. 1619 पर्यंत __________ येथे इंग्रज वखारी स्थापन झाल्या होत्या.

(a) अहमदाबाद (b) फोर्ट सेंट जॉर्ज (मद्रास)

(c) भडोच (d) आग्रा

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (b) (2) फक्त (a), (b) आणि (c)

(3) फक्त (a), (c) आणि (d) (4) (a), (b), (c) आणि (d)

By 1619 A.D., English factories were established at __________ .

(a) Ahmedabad (b) Fort St. George (Madras)

(c) Broach (d) Agra

**Answer Options :**

(1) Only (a) and (b) (2) Only (a), (b) and (c)

(3) Only (a), (c) and (d) (4) (a), (b), (c) and (d)

---

**32.** खालील वर्णनावरून योग्य पर्याय निवडा :

(a) या कॉलेजची स्थापना लॉर्ड वेलस्लीने केली.

(b) कलकत्ता येथे ते स्थित होते.

(c) इ.स. 1800 मध्ये ते स्थापन झाले.

(d) कंपनीच्या नागरी सेवकांना येथे खास प्रशिक्षण दिले जात होते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) बॅप्टिस्ट मिशनरी कॉलेज

(2) जनरल असेंब्लीज इन्स्टीट्यूशन

(3) प्रेसिडेन्सी कॉलेज

(4) फोर्ट विल्यम कॉलेज

Select the correct option based on the description given below :

(a) This college was founded by Lord Wellesley.

(b) It was located in Calcutta.

(c) It was founded in 1800 A.D.

(d) The civil servants of the company were given special training here.

**Answer Options :**

(1) Baptist Missionary College

(2) General Assembly's Institution

(3) Presidency College

(4) Fort William College

33. लॉर्ड मेयो यांच्या संदर्भात, हे/ही विधान/विधाने सत्य आहे/आहेत.

(1) त्यांना कारागृह सुधारण्यात स्वारस्य होते.

(2) अफगाणिस्तानचे अमिर शेर अली यांच्याशी त्यांचे मैत्रीपूर्ण संबंध होते.

(3) एका कैद्याने त्यांची हत्या केली.

(4) (1), (2), (3) सर्व सत्य आहेत.

With reference to Lord Mayo, this/these statement/s is/are true.

(1) He was interested in Jail Reforms.

(2) He had friendly relationship with Sher Ali, the Ameer of Afghanistan.

(3) He was murdered by a prisoner.

(4) (1), (2), (3) all are true.

---

34. विरेसलिंगम यांनी दक्षिण भारतात कोणत्या सामाजिक चळवळीला चालना दिली ?

(1) आर्य समाज (2) थिऑसॉफिकल सोसायटी

(3) प्रार्थना समाज (4) ब्राह्मो समाज

Which social movement was propagated by Veeresalingam in South India ?

(1) Arya Samaj (2) Theosophical Society

(3) Prarthana Samaj (4) Brahmo Samaj

---

35. अरविंदो घोष यांनी खालीलपैकी कोणत्या ग्रंथांचे लेखन केले ?

(a) प्रीसेप्ट्स ऑफ जीझस (b) द सिक्रेट ऑफ द वेदाज

(c) द सिंथेसिस ऑफ योगा (d) एसेज ऑन द गीता

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b), (c) आणि (d) (2) फक्त (a), (b) आणि (c)

(3) फक्त (b), (c) आणि (d) (4) फक्त (a) आणि (b)

Which of the following books were written by Aurobindo Ghosh ?

(a) The Precepts of Jesus (b) The Secret of the Vedas

(c) The Synthesis of Yoga (d) Essays on the Gita

**Answer Options :**

(1) (a), (b), (c) and (d) (2) Only (a), (b) and (c)

(3) Only (b), (c) and (d) (4) Only (a) and (b)

**36.** पुढील वाक्यात कोणाचे वर्णन आहे ?

(a) रामचंद्र व बरकतुल्ला त्यांचे सहाय्यक होते.

(b) सॅन फ्रान्सिस्को येथे त्यांनी नव्या पक्षाची स्थापना केली.

(c) भारत स्वातंत्र्य समितीचे ते संस्थापक होते.

(d) ते परदेशात क्रांतीकारक कार्य करीत होते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) श्यामजी कृष्ण वर्मा (2) लाला हरदयाल

(3) तारकनाथ दास (4) सरदार सिंह राणा

Who is described in the following sentences ?

(a) Ramchandra and Barkatullah were his assistants.

(b) He founded a new party in San Francisco.

(c) He was a founder of Indian Independence Committee.

(d) He was doing revolutionary work abroad.

**Answer Options :**

(1) Shyamji Krishna Varma (2) Lala Hardayal

(3) Taraknath Das (4) Sardar Singh Rana

---

**37.** कोल्हापूरच्या प्रभात फिल्म कंपनीचे खालील सामाजिक चित्रपट अतिशय गाजले आहेत :

(a) कुंकू (b) माणूस

(c) अमरज्योती (d) शेजारी

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (c) (2) (c) आणि (d)

(3) (a), (b) आणि (d) (4) वरील सर्व

The following social films of Kolhapur's Prabhat Film Company are very popular :

(a) Kunku (b) Manoos

(c) Amarjyoti (d) Shejari

**Answer Options :**

(1) (a) and (c) (2) (c) and (d)

(3) (a), (b) and (d) (4) All of the above

**38.** ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनी बद्दल काय सत्य आहे ?

(a) ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीला भारतीय शेतकऱ्यांच्या प्रकृतीची विशेष काळजी होती.

(b) ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीने अफूच्या लगवडीस प्रोत्साहन दिले.

(c) कंपनीने कालवे व धरणे बांधली.

(d) कंपनीच्या अधिकाऱ्यांनी मद्य विक्रेत्यां बरोबर नफा वाटून घेतला.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) सत्य आहेत

(2) (b) आणि (d) सत्य आहेत

(3) (b) आणि (c) सत्य आहेत

(4) फक्त (b) सत्य आहे

What is true about the British East India Company ?

(a) The British East India Company was more concerned about the health of the Indian farmers.

(b) The British East India Company encouraged the planting of poppy plants.

(c) The Company built canals and dams.

(d) The Company officials shared profits with the liquor shopkeepers.

**Answer Options :**

(1) (a) and (b) are true

(2) (b) and (d) are true

(3) (b) and (c) are true

(4) (b) alone is true

---

**39.** लहुजी वस्तादाकडे एक खास हत्यार होते, ते म्हणजे __________ .

(1) वाघनख (2) छडीपट्टा

(3) गुद्‌गुदा (4) दांडपट्टा

Lahuji Vastad had a special weapon, it was called __________ .

(1) Waghnakh (2) Chhadipatta

(3) Gudguda (4) Dandpatta

40. भार्गवराम विठ्ठल हे __________ या लोकप्रिय नावाने ओळखले जातात.

(1) मामा कोल्हटकर (2) मामा सराफ

(3) मामा वरेरकर (4) मामा भोसले

Bhargavram Vitthal is popularly known as __________.

(1) Mama Kolhatkar (2) Mama Saraf

(3) Mama Warerkar (4) Mama Bhosle

---

41. शि.म. परांजपेचा __________ आक्रमक राष्ट्रवादाचे मुखपत्र बनला होता.

(1) 'काळ' (2) 'स्वराज्य'

(3) 'नवाकाळ' (4) 'शिवाजीचे पुण्यवचन'

S.M. Paranjape's __________ became mouthpiece of the aggressive nationalist sentiments.

(1) 'Kal' (2) 'Swarajya'

(3) 'Navakal' (4) 'Shivajiche Punyavachan'

---

42. धनकवडी येथे ज्योतीराव फुलें यांनी व्हिक्टोरीया बालाश्रमाची सुरवात कोणाच्या मदतीने केली ?

(1) गोवांडे (2) परांजपे (3) शिवाप्पा (4) लोखंडे

With whose help did Jyotirao Phule establish Victoria Balashram at Dhanakavadi ?

(1) Govande (2) Paranjape (3) Shivappa (4) Lokhande

---

43. पुढील विधानापैकी कोणती विधाने **बरोबर** आहेत ?

(a) महात्मा गांधीजीनी टिळक स्वराज्य फंडाकरिता 1 कोटी 35 लाख रुपये गोळा केले होते.

(b) भारताने 1860 च्या सुरुवातीस 10·2 करोड रुपयाची अफूची निर्यात केली होती.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) योग्य आहे (2) फक्त (b) योग्य आहे

(3) (a) व (b) दोन्ही योग्य आहेत (4) (a) व (b) दोन्ही योग्य नाहीत

Which of the following statement/s is/are **correct** ?

(a) Mahatma Gandhi collected one crore thirty five lakhs rupees for Tilak Swarajya Fund.

(b) India exported 10·2 crores rupees worth of opium in the beginning of the year 1860.

**Answer options :**

(1) Only (a) is correct (2) Only (b) is correct

(3) Both (a) and (b) are correct (4) Both (a) and (b) are not correct

**44.** अशोकाचे प्रस्तरलेख व ते जेथे सापडले आहेत त्या स्थळांच्या जोड्या लावा.

| | **प्रस्तरलेख** | | **स्थळ** |
|---|---|---|---|
| (a) | कालसी | (i) | देहरादून |
| (b) | मन्सेरा | (ii) | हजारा जिल्हा, पाकिस्तान |
| (c) | धौली | (iii) | ओरीसा (ओडीशा) |
| (d) | शहबाजगढी | (iv) | पाकिस्तानातील पेशावर |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (2) | (i) | (iv) | (iii) | (ii) |
| (3) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (4) | (iv) | (iii) | (i) | (ii) |

Match the Ashokan inscriptions and the places they are found in.

| | **Inscription** | | **Place** |
|---|---|---|---|
| (a) | Kalsi | (i) | Dehradun |
| (b) | Mansera | (ii) | Hajara district, Pakistan |
| (c) | Dhauli | (iii) | Orissa (Odisha) |
| (d) | Shahbajgadhi | (iv) | Peshawar in Pakistan |

**Answer options :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (2) | (i) | (iv) | (iii) | (ii) |
| (3) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (4) | (iv) | (iii) | (i) | (ii) |

---

**45.** कोणत्या मोगल राजाच्या परवानगीने सुरत येथे ब्रिटीशांनी आपली पहिली फॅक्टरी स्थापन केली ?

(1) अकबर (2) जहाँगीर (3) हूमायून (4) शहाजहान

The first English factory was established at Surat with permission of which Mughal King ?

(1) Akbar (2) Jahangir (3) Humayun (4) Shah Jahan

---

**46.** भारतीय वृत्तपत्र सृष्टीचा जनक कोण होता ?

(1) वॉरन हेस्टिंग्ज (2) श्रीमती हेस्टिंग्ज

(3) हिक्की (4) चार्लस् मेटकाफ

Who was known as the Father of newspapers in India ?

(1) Warren Hastings (2) Mrs. Hastings

(3) Hicky (4) Charles Metcalfe

---

47. इंग्रजीतून शिक्षण ही एक राजकीय गरज होती असे मत पुढीलपैकी कोणाचे होते ?

(1) विल्यम विलबरफोर्स (2) विल्यम बेंटींक

(3) विल्यम चार्ल्स II (4) एलफिन्स्टन

Who from the following was of the opinion that education in English was a political necessity ?

(1) William Wilberforce (2) William Bentinck

(3) William Charles II (4) Elphinstone

---

48. कोणत्या मुस्लिम समाजसुधारकाने, मुस्लिमांना आधुनिक शिक्षण आणि विज्ञानाचा अभ्यास करून प्रगती साधता येईल असे म्हटले होते ?

(1) ईस्माइल हाजी (2) सर सय्यद अहमद खान

(3) मिर्झा गुलाम अहमद (4) खान अब्दूल गफार खान

Which Muslim social reformer told the Muslims that they could achieve progress by studying modern education and science ?

(1) Ismail Haji (2) Sir Syed Ahmed Khan

(3) Mirza Ghulam Ahmad (4) Khan Abdul Ghaffar Khan

---

49. वेदोक्त प्रकरणात लोकमान्य टिळकांनी कोणाची बाजू घेतली होती ?

(1) वतनदारांची (2) शाहू महाराजांची

(3) राजाराम महाराजांची (4) संभाजी महाराजांची

Whom did Lokmanya Tilak support in the Vedokta episode ?

(1) Vatandars (2) Shahu Maharaj

(3) Rajaram Maharaj (4) Sambhaji Maharaj

---

50. ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीला जकात न भरण्याची सुट कोणी नाकारली होती ?

(1) राजपुत्र सुजा (2) मुर्शिद कुली जाफर खान

(3) मीर जाफर (4) मीर कासिम

Who had refused to give the concession of exemption from payment of custom duty, to the British East India Company ?

(1) Prince Shuja (2) Murshid Quli Jafar Khan

(3) Mir Jafar (4) Mir Kasim

51. पुढीलपैकी कोणते घटक भारतीय राष्ट्रीय सभेच्या स्थापनेस कारणीभूत ठरले ?

(a) 1857 च्या उठावाचा परिणाम.

(b) दळण वळणाच्या साधनात झालेली क्रांती.

(c) भारतीय वृत्तपत्रांचे कार्य.

(d) आंतरराष्ट्रीय समुदायांचा दबाव.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b), (c) आणि (d) योग्य आहेत

(2) फक्त (a), (b) आणि (d) योग्य आहेत

(3) फक्त (b), (c) आणि (d) योग्य आहेत

(4) फक्त (a), (b) आणि (c) योग्य आहेत

Which factors contributed towards the establishment of the Indian National Congress ?

(a) The impact of the uprising of 1857.

(b) Revolution in the means of transport.

(c) The contribution of the Indian newspapers.

(d) Pressure from the International community.

**Answer Options :**

(1) (a), (b), (c) and (d) are correct

(2) Only (a), (b) and (d) are correct

(3) Only (b), (c) and (d) are correct

(4) Only (a), (b) and (c) are correct

---

52. 1857 च्या उठावात ब्रिटीशांना मदत करणाऱ्या पुढील व्यक्तीं पैकी विजोड व्यक्ती ओळखा.

(1) सालार जंग

(2) जंग बहादूर

(3) औधंच्या बेगम

(4) दोस्त मोहम्मद

Pick out the odd one from the following persons who had assisted the British during the Revolt of 1857.

(1) Salar Jung

(2) Jung Bahadur

(3) Begum of Oudh

(4) Dost Mohammad

---

53. बहूरूपी हे __________ यांचे आत्मचरित्र आहे.

(1) गणपतराव बोडस

(2) केशवराव दाते

(3) चिंतामणराव कोल्हटकर

(4) बापुराव पेंढारकर

Bahuroopi is the autobiography of __________ .

(1) Ganpatrao Bodas

(2) Keshavrao Date

(3) Chintamanrao Kolhatkar

(4) Bapurao Pendharkar

---

54. अफ्रिकेहून परत आल्यावर एक वर्ष तटस्थ रहा, असा सल्ला गांधीजींना पुढीलपैकी कोणी दिला होता ?

(1) आचार्य श्रद्धानंद (2) पुतळाबाई गांधी

(3) करमचंद गांधी (4) गोपाळ कृष्ण गोखले

Who from the following had asked Gandhiji to remain neutral for one year after his return from Africa ?

(1) Acharya Shraddhanand (2) Putlabai Gandhi

(3) Karamchand Gandhi (4) Gopal Krishna Gokhale

---

55. शेख दुल्हा कोण होते ?

(1) ते निझामाचे अधिकारी होते.

(2) ते मुगलांचे अधिकारी होते.

(3) ते पेंढाऱ्यांचे प्रमूख होते.

(4) ते विणकरांचे प्रमूख होते.

Who was Sheikh Dullah ?

(1) He was the officer of the Nizam.

(2) He was the officer of the Mughals.

(3) He was the chief of the Pendharis.

(4) He was the chief of the Weavers.

56. पुढील वाक्यात कोणाचे वर्णन केले आहे ?

(a) त्यांचे वडील एक धनाढ्य आणि प्रथितयश वकील होते.

(b) त्यांना त्यांच्या वडीलांनी स्कॉटीश चर्च कॉलेज मध्ये पाठविले, तेथून त्यांनी पदवी घेतली.

(c) त्यांच्या वडीलांनी त्यांना केंब्रिज विद्यापीठात पाठविले.

(d) 1920 मध्ये ते भारतीय नागरी सेवा (ICS) परीक्षा उत्तीर्ण झाले.

**पर्यायी उत्तरे :**

(1) दादाभाई नवरोजी

(2) सुभाष चंद्र बोस

(3) अरविंदो घोष

(4) चित्तरंजन दास

Who is described in the following sentences ?

(a) His father was a wealthy and prominent lawyer.

(b) His father sent him to Scottish Church College from where he graduated.

(c) His father sent him to Cambridge University.

(d) In 1920, he passed the Indian Civil Service (ICS) examination.

**Answer Options :**

(1) Dadabhai Naoroji

(2) Subhash Chandra Bose

(3) Aurobindo Ghosh

(4) Chittaranjan Das

---

57. अजिंठ्याच्या डोंगराचे प्राचीन नाव काय होते ?

(1) मंदागिरी

(2) अचिंत

(3) सुवर्णगिरी

(4) गिरनार

What was the ancient name of the Ajintha Mountain ?

(1) Mandagiri

(2) Achinta

(3) Suvarnagiri

(4) Girnar

---

58. गावे व संत यांच्या जोड्या जुळवा :

| | गावे | | संत |
|---|---|---|---|
| (a) | पैठण | (i) | सोपानदेव |
| (b) | एदलाबाद | (ii) | एकनाथ |
| (c) | सासवड | (iii) | मुक्ताबाई |
| (d) | आरणगाव | (iv) | सावतामाली |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (2) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (3) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (4) | (i) | (ii) | (iii) | (iv) |

Match the following Places with the Saints :

| | Place | | Saint |
|---|---|---|---|
| (a) | Paithan | (i) | Sopandeo |
| (b) | Edalabad | (ii) | Eknath |
| (c) | Saswad | (iii) | Muktabai |
| (d) | Aarangaon | (iv) | Savtamali |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (2) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (3) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (4) | (i) | (ii) | (iii) | (iv) |

59. सांगलीकर नाटक मंडळीची स्थापना कोणी केली ?

(1) सांगलीचे महाराज आप्पासाहेब पटवर्धन (2) दीनानाथ मंगेशकर
(3) कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर (4) विष्णूदास अमृत भावे

Who established the Sanglikar Natak Mandali ?

(1) Maharaja of Sangli Appasaheb Patwardhan (2) Deenanath Mangeshkar
(3) Krishnaji Prabhakar Khadilkar (4) Vishnudas Amrit Bhave

60. 'हे खरे महाराष्ट्राचे नाथ' असे संत एकनाथांबद्दल कोणी म्हटले आहे ?

(1) लोकमान्य टिळक (2) विष्णुबुवा ब्रह्मचारी
(3) न्यायमूर्ती म.गो. रानडे (4) रा.गो. भांडारकर

He is the real 'Nath of Maharashtra'. Who said this about Sant Eknath ?

(1) Lokmanya Tilak (2) Vishnubuva Brahmachari
(3) Justice M.G. Ranade (4) R.G. Bhandarkar

61. *विधान A :* 9 मार्च, 1942 रोजी जपानने रंगुन काबीज केले.

*कारण B :* रंगुन मधील विजया नंतर जपान कलकत्त्यावर हल्ला करू शकत होता.

**पर्यायी उत्तरे :**

(1) A बरोबर आहे, B चुकीचे आहे.
(2) A आणि B बरोबर आहेत.
(3) A आणि B चुकीचे आहेत.
(4) A चुकीचे आहे, B बरोबर आहे.

*Assertion A :* Japan captured Rangoon on $9^{th}$ March, 1942.

*Reason B :* Japan could attack Calcutta after its victory in Rangoon.

(1) A is true, B is false.
(2) A and B are true.
(3) A and B are false.
(4) A is false, B is true.

---

62. 8 फेब्रवारी, 1843 रोजी पुढीलपैकी कोणत्या व्यक्तींनी मानव धर्म सभा स्थापन केली होती ?

(a) दादोबा पांडूरंग तर्खडकर
(b) दुर्गाराम मच्छाराम मेहता
(c) लोकहितवादी गो.ह. देशमुख
(d) डॉ. भाऊ दाजी लाड

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (b) बरोबर आहेत
(2) फक्त (b) आणि (c) बरोबर आहेत
(3) फक्त (c) आणि (d) बरोबर आहेत
(4) सर्व बरोबर आहेत

Who from the following persons established the Manav Dharma Sabha on $8^{th}$ February, 1843 ?

(a) Dadoba Pandurang Tarkhadkar
(b) Durgaram Machharam Mehta
(c) Lokhitwadi G.H. Deshmukh
(d) Dr. Bhau Daji Lad

**Answer Options :**

(1) Only (a) and (b) are correct
(2) Only (b) and (c) are correct
(3) Only (c) and (d) are correct
(4) All are correct

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**63.** खालीलपैकी कोणत्या व्यक्ती 'हिंदूमहासभे'शी संबंधीत नव्हत्या ?

(a) स्वामी विवेकानंद

(b) प. मदन मोहन मालविय

(c) डॉ. मुंजे

(d) स्वामी दयानंद सरस्वती

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (b) बरोबर आहेत
(2) फक्त (b) आणि (c) बरोबर आहेत
(3) फक्त (a), (b) आणि (c) बरोबर आहेत
(4) फक्त (a) आणि (d) बरोबर आहेत

Who from the following persons were not associated with Hindu Mahasabha ?

(a) Swami Vivekanand

(b) Pandit Madan Mohan Malviya

(c) Dr. Munje

(d) Swami Dayanand Saraswati

**Answer Options :**

(1) Only (a) and (b) are correct
(2) Only (b) and (c) are correct
(3) Only (a), (b) and (c) are correct
(4) Only (a) and (d) are correct

---

**64.** चले जाव ठरावाचे महत्त्वाचे मुद्दे कोणते होते ?

(a) हिंदूस्थानने ब्रिटीशांच्या गुलामगिरीत राहणे, हे पाप आहे.

(b) ब्रिटीशांच्या गुलामगिरीतील आशिया व आफ्रिका खंडातील राष्ट्रांना भारतीय स्वातंत्र्य प्रेरणादायी ठरणार आहे.

(c) साम्राज्यवादाला रोखण्यासाठी हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळणे गरजेचे होते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (c)
(2) फक्त (a) आणि (b)
(3) फक्त (b) आणि (c)
(4) (a), (b) आणि (c)

What were the important points in the Quit India Resolution ?

(a) To remain in the slavery of the British is a sin for India.

(b) India's freedom will inspire the countries in the continents of Asia and Africa that are staying under the slavery of the British.

(c) Indian freedom was necessary to prevent imperialism.

**Answer Options :**

(1) Only (a) and (c)
(2) Only (a) and (b)
(3) Only (b) and (c)
(4) (a), (b) and (c)

**65.** बाळ गंगाधर खेरांच्या मंत्रीमंडळात अर्थ मंत्री कोण होते ?

(1) अन्नासाहेब लट्ठे

(2) शंकरराव देव

(3) गंगाधरराव देशपांडे

(4) अच्यूतराव पटवर्धन

Who was the Finance Minister in Bal Gangadhar Kher's ministry ?

(1) Annasaheb Latthe

(2) Shankarrao Deo

(3) Gangadharrao Deshpande

(4) Achyutrao Patwardhan

---

**66.** पुणे कराराच्या तरतुदी कोणत्या होत्या ?

(a) दलित वर्गासाठी प्रांतिक कायदेमंडळात काही जागा राखून ठेवाव्यात.

(b) दलित वर्गासाठी केंद्रीय कायदेमंडळात काही जागा राखून ठेवाव्यात.

(c) या तरतुदी बदलू नयेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b) आणि (c)

(2) फक्त (a) आणि (b)

(3) फक्त (b) आणि (c)

(4) फक्त (a) आणि (c)

What were the provisions of the Poona Pact ?

(a) To keep certain reserved seats for the depressed classes in State legislature.

(b) To reserve certain seats for the depressed classes in the Central legislature.

(c) These provisions were not to be changed.

**Answer Options :**

(1) (a), (b) and (c)

(2) Only (a) and (b)

(3) Only (b) and (c)

(4) Only (a) and (c)

**67.** 1924 मध्ये तुरुंगातून सुटून आल्यावर गांधीजी, सी. राजगोपालाचारी, राजेंद्र प्रसाद यांनी स्वत:ला पुढीलपैकी कोणत्या कामात व्यस्त ठेवले होते ?

(a) हरीजनांचा उद्धार करणे
(b) चरख्यावर हातानी सुत काढने
(c) स्त्रियांचा उद्धार करणे
(d) राजकारणातील उपक्रमात भाग घेणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (d)
(2) फक्त (a) आणि (b)
(3) फक्त (b) आणि (c)
(4) फक्त (c) आणि (d)

After their release from jail in 1924, Gandhiji, C. Rajagopalachari, Rajendra Prasad kept themselves busy with which of the following activities ?

(a) Upliftment of Harijans
(b) Hand-spinning on Charkha
(c) Upliftment of women
(d) Participate in political activities

**Answer Options :**

(1) Only (a) and (d)
(2) Only (a) and (b)
(3) Only (b) and (c)
(4) Only (c) and (d)

---

**68.** पुढील वाक्यात कोणाचे वर्णन केले आहे ?

(a) त्यांना जुलै, 1940 मध्ये अटक करण्यात आली.
(b) ते तुरुंगात भूक हरताळावर गेले.
(c) त्यांना 5 डिसेंबर, 1940 रोजी सोडण्यात आले.
(d) 1943 मध्ये त्यांचे लक्ष अति पूर्वेकडे गेले.

**पर्यायी उत्तरे :**

(1) वीर सावरकर
(2) चित्तरंजन दास
(3) सुभाष चंद्र बोस
(4) अच्यूतराव पटवर्धन

Who is described in the following sentences ?

(a) He was arrested in July, 1940.
(b) He went on hunger strike in prison.
(c) He was released on 5$^{th}$ December, 1940.
(d) In 1943, his attention was turned to the Far East.

**Answer Options :**

(1) Veer Savarkar
(2) Chittaranjan Das
(3) Subhash Chandra Bose
